**B. Women's Rights :**

**स्त्रियांचे हक्क /अधिकार :**

**प्रस्तावना :**

पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती.बालविवाह,केशवपन,शिक्षणबंदी यासारख्या असंख्य रूढी व प्रथांनी स्त्रियांना असहाय बनवले होते.स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे सर्वप्रथम कार्य महात्मा फुले यांनी केले.यानंतरच्या काळात राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्योद्धार व जातीयतेचे निर्मुलन या सारखेच महत्व स्त्रियांच्या न्याय हक्कांना व सर्वांगीण कल्याणाला दिले होते.स्त्रियांचे हक्क सुरक्षित रहावे या दृष्टीने आपल्या संस्थानात शाहू महाराजांनी काही कायदे निर्माण केले होते.शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे सरंक्षण करण्याचे महत्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले ते पुढीलप्रमाणे ....

**१.सक्तीची विवाहनोंदणी कायदा :**

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विवाहासंबंधीच्या कायद्यानुसार विवाह नोंदणी सक्तीची केली होती.विवाहाच्या वेळी वराचे वय १८ वर्षे व वधूचे वय १४ वर्षे असले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला होता.त्याबरोबरच १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या वधूस विवाहासाठी पालकांच्या संमतीची गरज नव्हती.स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या कायद्यानुसार देण्यात आले होते.प्रस्तुत कायदा म्हणजे स्त्री - पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे क्रांतिकारक पाउल होते.

**२.विधवा-पुनर्विवाह कायदा :**

मागासलेल्या समाजामध्ये अनेक जातींमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते.परंतु उच्च वर्णीय समाजातील जातींना मात्र विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हते.शाहू महाराजांनी या अन्यायी प्रथेस धक्का

देऊन जुलै १९१७ मध्ये विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला.विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत ज्या अडचणी होत्या त्या कायद्याने दूर करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला.

**3.पडदा पद्धतीचा निषेध :**

महाराष्ट्रातील उच्चवर्णीय विशेषता राजघराणी,मराठा सरदार व वतनदार घराणी यांच्यात पडदा पद्धत अस्तित्वात होती.पडदा पद्धत म्हणजे स्त्रियामधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपून टाकणारी प्रथा आहे, असे मत राजर्षी शाहू महाराज यांचे होते.त्यांनी या पडदा पद्धतीचा निषेध केला.पडदा पद्धतीने स्त्रियांना त्यांचा पराक्रम, शूरपणा कसा दाखवता येईल त्यामुळे हि प्रथा नष्ट करण्यासाठी या पद्धतीचा शाहू महाराजांनी निषेध केला होता.स्त्रियांना देखिल मुक्तपणे स्वाभाविकपणे जीवन जगण्याचा हक्क आहे आणि तो त्यांना मिळाला पाहिजे या तत्वाचा शाहूंनी पुरस्कार केला होता.

**४.आंतरजातीय विवाह कायदा :**

१२ जुलै १९१९ मध्ये आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर गॅझेट मध्ये प्रसिद्ध करण्यात आला.त्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन या मुख्य धर्माच्या लोकांना जातीनिर्भंध न पाळता आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा देण्यात आलेली होती.त्याशिवाय या कायद्यातील महत्वाची तरतूद म्हणजे विवाहाच्या वेळी पुरुषाचे वय १८ वर्षे व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला होता.याचा परिणाम बालविवाह या प्रथेला प्रखरपणे विरोध करण्यात आला.या नवीन कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहू महाराजांनी एक खास 'विवाह नोंदणी अधिकारी'नियुक्त केला होता.

**5.समंती वयाचा कायदा :**

ब्रिटीश सरकारने मोठ्या धाडसाने ‘संमती वयाचा कायदा’ १८९१ मध्ये मंजूर करून घेतला होता.मुलीचे संभोग वय किमान दहा ऐवजी बारा वर्षे असावे असा दंडक घालण्यात आला होता.हा कायदा  हिंदू धर्मात हस्तक्षेप करणारा आहे अशी भूमिका परंपरानिष्ठ लोकांनी घेऊन या कायद्याला प्रखर विरोध केला होता.या पार्श्वभूमीवर विवाहप्रसंगी मुलीचे वय किमान १४ वर्षे असावे,असे सांगणारा  शाहू महाराजांचा कायदा हा ब्रिटीशांच्या कायद्यापेक्षा अधिक पुरोगामी होता हे यावरून स्पष्ट होते.

**6.क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :**

अनेक कुटुंबामध्ये स्त्रियांना तिचे पती व नातेवाईक यांच्याकडून  मोठ्या प्रमाणत छळ केला जात होता.अशा अपराधाना त्यावेळी इंडियन पिनल कोड सुद्धा काही शिक्षा करू शकत नव्हते.शाहू महाराजांनी या अत्याचारापासून स्त्रियांची सोडवणूक करण्यासाठी २ ऑगस्ट १०१९ मध्ये सर्वसमावेशक कायदा मंजूर केला.पुरुषवर्गाकडून स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी शाहू महाराजांनी हा कायदा मंजूर केला होता.या कायद्यानुसार स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्याला 6 महिने कारावास व २०० रु.दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आलेली होती.